MHNG110000012026

–

<u>नियमीत दिवाणी दावा क्र.०१/२०२६ मधील निशाणी क्र.०५ वरील आदेश</u>

(विवेक व इतर विरुध्द अरुण व इतर)

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचे विरुध्द एकतर्फा अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळावा याकरीता दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.०१ व ०२ हे वादी क्र.०१ व ०२ चे मामा आहेत. वादी क्र.०३ हा वादी क्र.०१ व ०२ चा वडील आहे. त्यांच्या कथनानुसार वाद मिळकत ही वडीलोपार्जीत असुन त्यामध्ये वाटणी झाली नाही. प्रतिवादी यांचे वडील मंगलदास यांच्या मृत्युनंतर वारसाने प्रतिवादी यांचे वाद मिळकतीला नाव लागले. परंतु, त्यावेळी वादी क्र.०१ व ०२ यांच्या आईचे नाव वारसा आधारे वाद मिळकतीला लागले नाही. सध्या वाद मिळकत ही प्रतिवादी यांच्या नावाने असुन प्रतिवादी हे वाद मिळकत हस्तांतर करण्याच्या तयारीत आहेत. वादी क्र.०१ व ०२ यांचा वाद मिळकतीमध्ये हक्क असुन त्यांचा त्यामध्ये अविभक्त हिस्सा आहे.

०२. नि.क्र.०५ वरील अर्ज व संपूर्ण अभिलखाचे अवलोकन केले. वादीतर्फे श्री. पी.के. थोटे यांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अभिलेखावरुन असे दिसुन येते की प्रतिवादी हे वादी क्र.०१ व ०२ यांचे मामा आहेत. वाद मिळकत ही त्यांचे वडील मंगलदास यांच्या नावाने होती. मंगलदास यांच्या मृत्युनंतर वाद मिळकत वारसाने प्रतिवादींच्या

नावाने झाली. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, वादींची मयत आई अनिता ही प्रतिवादींची बहिण आहे. परंतु तिचे वडील मंगलदास यांच्या मृत्युनंतर वारसा आधारे तिचे नाव वादमिळकतीला लागले नाही. वादी क्र.०१ व ०२ हे प्रतिवादीची मयत बहिण अनिता हिची मुले असल्यामुळे त्यांचा वाद मिळकतीमध्ये वारसाआधारे अविभक्त हिस्सा आहे. आज घडीला वाद मिळकत ही प्रतिवादी यांच्या नावाने आहे. त्यामुळे त्यांच्याकडुन वाद मिळकत हस्तांतर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रतिवादींनी वाद मिळकत हस्तांतर केल्यास वादी क्र.०१ व ०२ यांच्या हक्कावर परिणाम होऊन प्रकरणामध्ये गुंतागुंत निर्माण होईल. त्यामुळे नि.क्र.०५ वरील तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज निकाली होईपर्यंत वाद मिळकतीची परिस्थिती कायम ठेवण्यासाठी वादींच्या हक्कात एकतर्फा अंतरीम मनाई हुकुम पारीत करणे आवश्यक आहे. वादींच्या लाभात एकतर्फा अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट एकतर्फा अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादींचे नुकसान होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

०१. प्रतिवादी अथवा त्यांच्या वतीने इतर कोणीही नि.क्र.०५ वरील अर्जावर आदेश होईपर्यंत वाद मिळकत कोणालाही कोणत्याही मार्गाने हस्तांतर करु नये असा एकतर्फा अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकुम पारीत करण्यात येतो.

०२. वादींच्या हक्कात मंजुर करण्यात आलेला एकतर्फा अंतरीम तुर्तातुर्त मनाई हुकुम कायम का करण्यात येऊ नये याकरीता प्रतिवादींना नोटीस जारी करण्यात यावी.

०३.  वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३–अ ची पुर्तता करावी.

PARASRAM KUNDLIK MUTKULE

Digitally signed by PARASRAM KUNDLIK MUTKULE
Date: 2026.01.05 11:20:06 +0530

दिनांक – ०३/०१/२०२६.

(पी.के.मुटकुळे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ, स्तर,
कुही, जि. नागपूर.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

Name of the Stenographer : Sau. Varsha Rajendra Sawarkar.
Attached to Civil Judge, Jr. Dn. &
J.M.F.C. Kuhi.